# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date – 31 March 2025
# Time 18.10 to 18.20
# Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ३१ मार्च २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- रिझर्व्ह बँकेच्या ९० व्या वर्षपूर्ती सोहळ्यासाठी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज आणि उद्या मुंबई दौऱ्यावर
- औरंगजेबाची कबर हे संरक्षित स्मारक;मात्र त्याचं उदात्तीकरण करू नये- मुख्यमंत्र्यांचा इशारा
- खासगी शैक्षणिक संस्थांमध्ये SC, ST आणि OBC साठी राखीव जागांसाठी कायदा करण्याची काँग्रेसची मागणी
- ईद उल फित्र अर्थात रमजान ईदचा सण सर्वत्र उत्साहात साजरा

आणि

- बीड प्रार्थनास्थळ स्फोट प्रकरणी दोघांना अटक; तीन एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी

****

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज आणि उद्या मुंबई दौऱ्यावर येणार आहेत. आज संध्याकाळी त्यांचं मुंबईत आगमन होईल. उद्या भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ९०व्या वर्षपूर्ती सोहळ्याच्या समारोप समारंभाला राष्ट्रपती उपस्थित राहणार आहेत.

****

नागपूर इथल्या भारती कृष्ण विद्या विहार इथं वैदिक गणिताचे गुणवत्ता केंद्र उभारण्यासाठी शासनातर्फे सर्वोतोपरी सहकार्य करण्याचं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं आहे. आद्य शंकराचार्य कृष्ण तीर्थ महाराज लिखित वैदिक गणिताच्या दोन खंडांचे प्रकाशन मुख्यमंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांच्या हस्ते झालं त्यावेळी मुख्यमंत्री

बोलत होते. वैदिक गणिताची महती आणि उपयोग येणाऱ्या पिढ्यांपर्यंत पोहचणे गरजेचे आहे, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. प्राचीन भारतीय परंपरेतून आलेल्या वैदिक गणिताचा विचार हा विश्व कल्याणासाठी आहे. जगात अध्यात्मावर आधारित घडत असलेल्या विविध परिवर्तन आणि पुनर्रचनेमध्ये वैदिक गणितही महत्वाची भूमिका पार पाडू शकते असा विश्वास मोहन भागवत यांनी व्यक्त केला.

****

मुगल शासक औरंगजेबाची कबर हे संरक्षित स्मारक आहे, मात्र त्याचं उदात्तीकरण करू दिलं जाणार नाही, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे. ते आज नागपुरात वार्ताहरांशी बोलत होते. कुणाला आवडो की न आवडो औरंगजेबाची कबर हे संरक्षित स्मारक आहे, असं फडणवीस म्हणाले. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या खुलताबाद इथली औरंगजेबाची कबर काढून टाकण्याची मागणी गेले काही दिवस हिंदुत्त्ववादी संघटना करत होत्या. त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांचं हे वक्तव्य महत्त्वाचं मानलं जात आहे.

****

औरंगजेबाचा मुद्दा नाहक उपस्थित केला जात असल्याचं राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ नेते भैय्याजी जोशी यांनी सांगितलं. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी औरंगजेबाच्या कबरीविषयी केलेल्या टिपणीबद्दल प्रतिक्रिया देताना ते नागपुरात वार्ताहरांशी बोलत होते. औरंगजेब इथंच मरण पावला, त्यामुळे त्याची कबर इथं आहे आणि ती तिथेच राहील, ज्याची श्रद्धा आहे तो कबरीला भेट देईल असं जोशी म्हणाले.

****

देशातल्या खासगी, बिगरअल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांमध्येही अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांसाठी राखीव जागा ठेवाव्यात यासंदर्भात सरकारनं कायदा आणावा, अशी मागणी काँग्रेसनं केली आहे. या प्रवर्गातल्या नागरिकांच्या प्रगतीसाठी विशेष कायदे करायचा अधिकार सरकारला देणाऱ्या राज्यघटनेतल्या कलम १५, पोटकलम १५च्या अंमलबजावणीसाठी शिक्षण, महिला, युवा आणि क्रीडा क्षेत्रातल्या संसदीय समितीनंही नव्या कायद्याची शिफारस केल्याचं काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी म्हटलं आहे.

****

राज्य शासनाच्या सर्व विभागांनी राज्य मंत्रिमंडळासमोर नवा प्रस्ताव ठेवताना खर्चात अर्थसंकल्पातल्या तरतुदीपेक्षा जास्त झालेल्या वाढीचा स्पष्ट उल्लेख करण्याचे निर्देश राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी दिले आहेत. नवीन प्रस्तावात खर्चात झालेली वाढ यामुळे स्पष्टपणे लक्षात येईल, तसंच त्या वाढीसाठी संबंधित विभागाला जबाबदार धरता येणार आहे. वाढलेला खर्च मूळ तरतुदीपेक्षा किती जास्त आहे हे नमूद केल्याशिवाय प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर ठेवू नये असे निर्देश सौनिक यांनी दिले आहेत. राजकोषीय तूटीला आवर घालणं हा याचा हेतू असून हा निर्णय एका व्यापक धोरणाचा भाग आहे, असं एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याने सांगितलं.

****

सोलापूर विद्यापीठाच्या जमिनीसंदर्भातील प्रश्न येत्या पंधरा दिवसात मार्गी लावू अशी ग्वाही विधान परिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे यांनी दिली आहे. ते आज सोलापूर इथं एका कार्यक्रमात बोलत होते. विद्यापीठाच्या ४७२ एकर जमिनीपैकी बरीचशी जमीन वनविभागकडे असल्याने विद्यापीठाचा विकास रखडला असल्याची खंत कुलगुरु डॉक्टर प्रकाश मनोहर यांनी व्यक्त केली होती, वन कृषी तसंच उच्च तंत्र शिक्षण विभागाच्या प्रमुख अधिकाऱ्यांची आणि मंत्र्यांची संयुक्तिक बैठक घेऊन विद्यापीठाचा हा प्रश्न ३१ मे पूर्वी मार्गी लावू असं शिंदे यांनी सांगितलं.

****

शिर्डी औद्योगिक वसाहतीत होणाऱ्या डिफेन्स क्लस्टर प्रकल्पामुळे जिल्ह्याच्या लौकिकात भर पडणार असल्याचा विश्वास, राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला आहे. सावळीविहीर खुर्द इथं डिफेन्स क्लस्टरअंतर्गत निबे ऑर्डनन्स ग्लोबल लिमिटेड कंपनीच्या भूमिपूजनप्रसंगी ते बोलत होते. या क्लस्टरमुळे शिर्डी परिसराच्या औद्योगिक विकासाला चालना मिळून रोजगारात वाढ होईल, असा विश्वास विखे पाटील यांनी व्यक्त केला.

दरम्यान, शिर्डी इथल्या श्री साईबाबा आंतरराष्ट्रीय विमानतळावर रात्रीच्या वेळी विमान उतरवण्याच्या सेवेचा काल शुभारंभ करण्यात आला. इंडिगो कंपनीच्या विमानाने यावेळी यशस्वी लँडिंग केलं.

****

देशभरात आज ईद-उल-फित्रचा उत्साह आहे. मुस्लीम धर्मियांच्या पवित्र रमजान महिन्याची सांगता ईदच्या दिवशी होते. रमजान ईदनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत.
हा सण समाजात आशा, आकांक्षा, सद्भाव आणि दयाळूपणाची भावना वृद्धिंगत करेल, असं सांगत पंतप्रधान मोदी यांनी, सगळ्यांना आनंद आणि यश मिळण्याची प्रार्थना केली.
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी जनतेला ईदच्या शुभेच्छा दिल्या आहेत. रमजान ईद हा सण समाजात परस्परांबद्दल प्रेम, आपुलकी आणि मदतीची भावना वाढवतो. महाराष्ट्रासह देशाच्या सामाजिक ऐक्य आणि प्रगतीसाठी ही बंधुत्वाची भावना अत्यंत आवश्यक असल्याचं पवार यांनी समाजिक माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.
राज्यभरातही ईद मोठ्या उत्साहात साजरी होत आहे.

छत्रपती संभाजीनगर इथं छावणी तसंच उस्मानपुरा परिसरातल्या ईदगाह मैदानासह विविध ठिकाणी सामुहिक नमाज पठण करण्यात आलं. यावेळी बंदोबस्तावर असलेले पोलिस अधिकारी तसंच कर्मचाऱ्यांचा एमआयएम पक्षाकडून सत्कार करण्यात आला.

हिंगोली इथंही आज सकाळी ईदगाह मैदानावर मुस्लिम बांधवांनी नमाज अदा करून एकमेकांना शुभेच्छा दिल्या. जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी मुस्लिम बांधवांना पोलिसांच्या वतीने ईद निमित्त शुभेच्छा दिल्या.

नांदेड इथं देगलूर नाका परिसरातील ईदगाह मैदानावर नमाज अदा करण्यात आला. धुळे शहरातील पांझरा नदी किनारच्या ईदगाह मैदानावर मुस्लिम बांधवांनी एकत्र येत सामुहिक नमाज पठण केलं. नाशिक इथं सामुहिक नमाजाला उपस्थित मुस्लीम बांधवांनी वक्फ दुरूस्ती विधेयकाला हात उंचावून विरोध दर्शवला.

****

बीड जिल्ह्यात गेवराई तालुक्यातल्या अर्धमसला इथं प्रार्थनास्थळात स्फोट प्रकरणी विजय गव्हाणे आणि श्रीराम सागडे या दोन संशयित आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांना विशेष न्यायालयानं ३ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. हे दोघेही आरोपी अर्धमसला गावातील रहिवासी आहेत. दरम्यान, दहशतवाद विरोधी पथक-एटीएस आता या प्रकरणाचा समांतर तपास करणार आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीकडे जिलेटिन वापराचा कोणताही परवाना नसल्याचं समोर आलं आहे. आरोपींनी स्फोट घडवून आणण्यासाठी जिलेटिन कुठून आणलं, या स्फोटामागे नेमका कोणाचा हात आहे, याबाबत एटीएस कसून चौकशी करत असल्याचं सूत्रांनी सांगितलं.
दरम्यान, दोन्ही आरोपीवर यूएपीए कायदा लागू करावा, अशी मागणी माजी खासदार सय्यद इम्तियाज जलील यांनी केली आहे. छत्रपती संभाजीनगर इथे रमजान ईदच्या नमाजानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. नागपूर हिंसाचारातल्या आरोपीचं घर पाडण्यात आलं, तशीच कारवाई याही प्रकरणात करावी, असंही माजी खासदार सय्यद इम्तियाज यांनी म्हटलं आहे.

****

बीड जिल्हा कारागृहात आज दोन कैद्यांमधे किरकोळ कारणावरुन बाचाबाची, आणि नंतर हाणामारी झाली. या तुरुंगात संतोष देशमुख हत्या प्रकरणातले, तसंच परळी इथल्या बापू आंधळे खून प्रकरणातले आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. मात्र या मारहाण प्रकरणाशी सुदर्शन घुले, वाल्मीक कराड यांचा संबंध नाही, असं बीड जिल्हा करागृह अधिक्षक बी.एन. मुलाणी यांनी सांगितलं. दरम्यान संतोष देशमुख हत्या प्रकरणातल्या आरोपींना या कारागृहातून अमरावती किंवा नागपूरच्या कारागृहात हलवावं, अशी मागणी आमदार सुरेश धस यांनी केली आहे.

****

धाराशिव जिल्ह्यात भूम इथल्या खवा क्लस्टरमध्ये इंडक्शन मशीनवर खवा निर्मितीसाठी वीज जोडणीला शासनाची मान्यता मिळाली आहे. इंडक्शन मशीनद्वारे सोलरवर खवा निर्मिती करण्याचा भारतातला पहिला प्रकल्प भूम इथल्या या क्लस्टरमध्ये सुरु करण्यात आला आहे. या उत्पादकांना आता ॲग्रीकल्चर अँड अदर या टेरिफ हेडनुसार वीज जोडणी मिळणार असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. या निर्णयामुळे खवा उत्पादकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

****

पश्चिम रेल्वेचे महाव्यवस्थापक अशोक मिश्रा यांनी आज अंबाजोगाई इथं योगेश्वरी देवी मंदिराला भेट देऊन दर्शन घेतलं, यावेळी मराठवाडा जनता विकास परिषदेच्या अंबाजोगाई शाखेच्या वतीने अंबेजोगाई रेल्वे सेवेसंदर्भात त्यांना निवेदन सादर करण्यात आलं.

****

उन्हाळी हंगामासाठी लातूर विभागातून जादा बसेस सोडल्या जाणार असून १५ एप्रिल ते १५ जूनपर्यंत संगणकीय आरक्षण उपलब्ध करुन देण्यात आले आहे. प्रवासी संबंधित बस स्थानकातील आरक्षण केंद्रावर जाऊन किंवा आपल्या मोबाईलवरील बस रिझर्वेशन ॲपवरुन आसन आरक्षित करु शकतात, असं विभागातर्फे कळवण्यात आलं आहे.

****

क्रिकेट

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज मुंबईत वानखेडे मैदानावर मुंबई इंडियन्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात सामना होणार आहे. संध्याकाळी साडेसातवाजता सामना सुरु होईल.

****

हवामान

राज्यात आज सर्वात जास्त ४२ पूर्णांक चार अंश सेल्सिअस तापमान चंद्रपूर इथं नोंदवलं गेलं. मराठवाड्यात धाराशिव इथं ३८ पूर्णांक सात अंश, छत्रपती संभाजीनगर इथं ३९ अंश, परभणी इथं ३९ पूर्णांक नऊ तर बीड आणि नांदेड इथं ४० अंश सेल्सिअसहून अधिक तापमानाची नोंद झाली.

****